दैनिक **महावृत्त**

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १७० वा गुरूवार दि.१९ डिसेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.




# 'दुसऱ्याने शेण खाल्लं, म्हणून तुम्ही..', अमित शाह यांच्या बाबासाहेब आंबेडकरांसंबंधीच्या विधानावरुन उद्धव ठाकरे आक्रमक

भाजप नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काल संसदेत बोलताना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ज्या पद्धतीने उल्लेख केला, त्यावरुन आता महाराष्ट्रातील विरोधी पक्ष आक्रमक झाला आहे.

आज त्याच संदर्भात उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेतली. गेले अडीच तीन वर्ष त्याही आधीपासून सातत्याने पाहत आहोत. भाजपा आणि त्यांचे उमर्ट नेते महाराष्ट्रातल्या महापुरुषांचा, महाराष्ट्रातल्या देवतेंचा ज्या प्रकारे अपमान करत आहे, तो अपमान आता सहनशीलतेपलीकडे गेला आहे. जेव्हा कोशयारी नावाचे गृहस्थ राज्यपालपदी बसवलं त्यांनी महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या लग्नाच्या वयावरुन अपमान केला होता. विचित्र टिप्पणी केली होती. छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला होता. आम्ही मोर्चा जरुर काढलेला. पण भाजपने ना त्यांच्याकडून माफी मागून घेतली किंवा दूर केलं. मधल्याकाळात घाईघाईन छत्रपती शिवाजी महाराजांना पुतळा बसवताना त्यात भ्रष्टाचार केला. तो पुतळा आठ महिन्यात पडला. त्यानंतर काय घडलं तुम्हाला कल्पना आहे असं उद्धव ठाकरे म्हणाले.

महाराष्ट्र जणू काही गांडुळांचा प्रदेश आहे, असं भाजपच्या वरिष्ठ नेत्यांना वाटायला लागलय. महाराष्ट्रातले उद्योग ओरबाडून गुजरातला नेत आहेत. आता कहर झाला. काल देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी अत्यंत उमर्टपणाने देशातली घटना, संविधान ज्यांनी लिहिल त्या महाराष्ट्राच्या सुपूत्राचा महाराष्ट्राच्या, देशाच्या महामानवाचा ज्या प्रकारे उल्लेख केला. आंबेडकर फॅशन झाली त्या ऐवजी देवाचं नाव घेतलं असतं, तर सात जन्माच पुण्य लाभल असतं असा अत्यंत हिणकस उद्दाम उल्लेख केला. मला वाटतं भाजपचा बुरखा फाटला आहे. भाजपच ढोंग समोर आलेलं आहे अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी अमित शाह यांच्या वक्तव्याचा समाचार घेतला.

मिंधे, अजित पवारांना बाबसाहेबांचा अपमान मान्य आहे का?

यांना महाराष्ट्र खतम करायचा आहे. नेहरु नेहरु करता करता आंबेडकरांवर बोलायला लागले, एवढी याची हिम्मत वाढली. आता मला जे, भाजपला पाठिंबा देणारे इतर पक्ष आहेत, नितीश कुमार, चंद्राबाबू विशेष म्हणजे रामदास आठवले काय करतात ? रामदास आठवले राजीनामा देणार का? महाराष्ट्रात भाजपसोबत जे आमचे मिंधे, अजित पवार गेलेत, त्यांना बाबासाहेबांचा अपमान मान्य आहे का? ते कळलं पाहिज असं उद्धव ठाकरे म्हणाले.

संघाने खुलासा करावा

महाराष्ट्र सहनशीलतेच्या पलीकडे गेलेला आहे. संघाने खुलासा केला पाहिजे, हे तुम्ही अमित शाहंकडून बोलून घेतलय का? आता बाबासाहेबांचा असा उल्लेख केल्यावर भाजप अमित शाहंवर काही कारवाई करणार आहे की नाही? भाजपच ढोंग बाहेर पडलं आहे. आता महाराष्ट्राने, देशाने शहाणं झालं पाहिजे असं उद्धव ठाकरे म्हणाले.

तर मोदींनी सत्तेवर राहू नये

ससंदेत संविधानावर चर्चा सुरु आहे. ज्यांनी संविधान आपल्याला दिलं, त्या आंबेडकरांबद्दल, बाबासाहेबांबद्दल अमित शाहसारखा एखादा माणूस तुच्छेने बोलू कसा शकतो? याचं उत्तर मिळालं पाहिजे. भाजपला सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही. घटनाकारांचा अपमान करणाऱ्यांना अभय देणार असतील, तर मोदींनी सत्तेवर राहू नये, मोदींनी अमित शाहंवर कारवाई करावी असं उद्धव ठाकरे म्हणाले.

हे भाजपच्या मनातलं काळं

महाराष्ट्र काही करुन शकत नाही, अशा मस्तीत हे वागू लागले आहेत. आंबेडकरांच, महाराष्ट्राच नाव पुसायला निघालेले आहेत. हे भाजपच्या मनातलं काळं आहे. संघाने आणि भाजपने बोलल्याशिवाय ते असं बोलू शकत नाहीत. संसदेत बोलतान फार जबाबदारीने बोलावं लागत असं उद्धव ठाकरे म्हणाले. पत्रकारांनी उद्धव ठाकरेंना विचारलं की, पंतप्रधान मोदी म्हणतायत की, काँग्रेसने बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान केला,

# ३० दिवसात येडेश्वरी साखर कारखाना युनिट नं.१चे २ लाख गाळप पूर्ण




केज/प्रतिनिधी आनंदगांव(सा) येथील येडेश्वरी साखर कारखाना युनिट नं.१ ने दि. १६ नोव्हेंबर २०२४ रोजी ११ व्या गळीत हंगामाची सुरुवात केली. आणि येडेश्वरी साखर कारखान्याने दोन लाख टन गाळप करून ठरवलेल्या उद्दिष्टाकडे योग्य रीतीने वाटचाल चालू केली आहे. कर्मचा-यांनी एकमेकांचे अभिनंदन करून आनंद साजरा केला.येडेश्वरीची प्रत्यक्ष गाळपाला सुरुवात १६ नाव्हेंबर २०२४ झाली होती. आज रोजी कारखान्याने २ लाख टन गाळप करून साखरेचे उत्पादन८७ हजार २५० क्विंटल घेतले. कारखाना प्रतिदिवस ७ हजार मॅट्रिक टन सरासरी प्रमाणे गाळप करीत आहे. तसेच कारखान्याच्या आसवानी प्रकल्पात इथेनॉल १९ लाख ३७ हजार ३७४ लिटर व रेक्टीफाईड स्पिरीट ४६ लाख ७५ हजार ३४० लिटर उत्पादन झाले असुन सहवीजनिर्मिती प्रकल्प सुद्धा चांगल्या पध्दतीने सुरळीत सुरु असून दररोज ताशी १० मेगावॅट वीजनिर्मिती केली जाते. त्यात आजअखेर ९९ लाख ९७ हजार वीज युनिट निर्मिती झाली असून त्यापैकी ३९ लाख ७२ हजार ६०० युनिट महावितरण कंपनीला विक्री केली. ११ वा गळीत यशस्वीरीत्या चालवला जात आहे. या यशाबद्दल कारखान्याचे सर्वेसर्वा बजरंग सोनवणे यांनी सर्व ऊस उत्पादक शेतकरी,संचालक ,सभासद, बिगर सभासद, तोडणी वाहतूक ठेकेदार व सर्व कारखान्याचे अधिकारी वर्ग व कर्मचारी यांचे २ लाख मे.टन गाळप केल्याबद्दल अभिनंदन केले. व तसेच पुढील गाळप उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्व कर्मचा -यांना प्रोत्साहित केले.

# चाकूरात इंजि. अनिलकुमार गायकवाड मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, अभ्यासिका व ग्रंथालयाचे उद्घाटन. बालाजी पाटील चाकूरकर यांच्या पुढाकारातून

> स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांना जे पुणे,मुंबई,दिल्लीला जाऊ शकत नाहीत त्या विद्यार्थ्यांना इथे शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून द्यावे आणि ज्यांनी इंजिनियर झाल्यानंतर महाराष्ट्रातील पाच हजारापेक्षा जास्त लोकांना जीवनामध्ये उभे करण्याचं काम केले व त्यांच्या परिस्पर्शाने मी उभा टाकलो त्यांच्या नावाने इंजि.अनिलकुमार गायकवाड मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र अभ्यासिका व ग्रंथालयाची सुरुवात केली आहे.येणाऱ्या वीस वर्षांमध्ये या भागातील गोरगरिबांची २५ पेक्षा जास्त मुले,मुली आयएएस,आयपीएस अधिकारी झालेले असतील.
>
> ❋बालाजी पाटील चाकूरकर ❋





चाकुर ( सुशिल वाघमारे) येथील लोकनेते बालाजी पाटील चाकूरकर यांच्या संकल्पनेतून दि.१४ डिसेंबर रोजी सायंकाळी येथील कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयाच्या बाजूला मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र,अभ्यासिका व ग्रंथालयाचे व जनसंपर्क कार्यालयाचा शुभारंभ सोहळा संपन्न झाला. चाकूर व अहमदपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील उच्चशिक्षित विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे यूपीएससी,एमपीएससी व इतर स्पर्धा परीक्षेसाठी मुंबई,पुणे दिल्ली या ठिकाणी जावू शकत नव्हते.या विद्यार्थ्यांची होणारी अडचण लक्षात घेऊन लोकनेते बालाजी पाटील चाकूरकर यांनी चाकूर येथे मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू करण्याचा संकल्प केला आणि दि.१४ डिसेंबर रोजी चाकूर येथील कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयाच्या बाजूला याची सुरूवात केली.यावेळी इंजि.अनिलकुमार गायकवाड मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र,अभ्यासिका व ग्रंथालयाचे उद्घाटन सहाय्यक पोलीस अधीक्षक आयपीएस बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या हस्ते झाले तसेच सर्व सामान्य लोकांची कामे विनामूल्य सर्व उपलब्ध करून देण्यासाठी जनसंपर्क कार्यालयाचा शुभारंभ माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर जिल्हा बँकेचे माजी उपाध्यक्ष विठ्ठलराव माकणे हे होते तर लोकनेते बालाजी पाटील चाकूरकर,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती निळकंठ मिरकले,उमाकांत चनगे,नितीन पाटील भोसीकर,प्रसाद चनगे,मकबुल वलांडीकर,हरिभाऊ गायकवाड,डॉ. एन.जी. मिर्झा,प्रशांत बिबराळे,अविनाश पवार आदीसह विविध मान्यवर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन रामेश्वर मुंडे यांनी केले. यावेळी चाकूर अहमदपूर तालुक्यातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी,महिला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिलांसाठी मोफत सिटी बस प्रवास योजना स्मार्टकार्ड नोंदणी केंद्रात बदल

लातूर/प्रतिनिधी :- लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने महिलांसाठी मोफत प्रवास बस योजना लातूर शहर बसमध्ये सध्या चालू आहे. शहर बस प्रवास करणा-या महिलांचा प्रवास सुखकर व्हावा व त्यांना अधिकाअधिक सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने लातूर शहर महानरपालिका,मार्फत महिला शहर बस पास (स्मार्ट कार्ड) योजना चालू करण्यात आली आहे. तरी सदर योजनेचा लाभ घेणेसाठी महानगरपालिका हद्दीमधील राहणा-या महिलांनी आपल्या आधार कार्डची झेरॉक्स प्रत व सोबत फॉर्म भरून गंजगोलाई शहर बस स्टॉप, क्रिडा संकुल शहर बसस्टॉप, लातूर शहर महानगरपालिका कार्यालय,लातूर, क्षेत्रीय कार्यालय बी ठाकरे चौक,लातूर,क्षेत्रीय कार्यालय सी, डाल्डा फॅक्ट्री लातूर, क्षेत्रीय कार्यालय अ ,मनपा कार्यालय लातूर, क्षेत्रीय कार्यालया ड गांधी चौक,लातूर येथे दिनांक १३/१२/२०२४ पासून रजिस्ट्रेशन चालू करण्यात आले होते. परंतु महिला प्रवाशांची मागणी लक्षात घेता दिनांक १९/१२/२०२४ पासून खालील ठिकाणी सुधारीत बदल करण्यात आलेला आहे. संविधान चौक, पाण्याची टाकी, बार्शी रोड लातूर, जुना रेणापूर नाका शहर बस थांबा लातूर, गंजगोलाई शहर बस स्टॉप, क्रिडा संकुल शहर बसस्टॉप, लातूर शहर महानगरपालिका कार्यालय,लातूर, क्षेत्रीय कार्यालय बी ठाकरे चौक,लातूर, क्षेत्रीय कार्यालय सी, डाल्डा फॅक्ट्री लातूर येथे देऊन आपले फॉर्म भरून रजिस्ट्रेशन करून घ्यावे. त्यासाठी लातूर शहर हद्दीत राहणा-या महिलांनी आपल्या आधारकार्डची झेरॉक्स प्रत देऊन फॉर्म भरून आपल्या स्मार्ट कार्ड साठी महिला प्रवाशानी नजीकच्या केंद्रात जावून स्मार्ट कार्ड साठी नोंदणी करावी. याची शहर बस मधुन प्रवास करणा-या लातूर शहर महानगरपालिका, लातूर हद्दीतील राहणा-या सर्व महिलांनी नोंद घ्यावी.

# सरपंच संतोष देशमुख व सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येच्या निषेधार्थ केज तहसील कार्यालयावर दलित समाज बांधवांचा आक्रोश मोर्चा



केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख व परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येच्या निषेधार्थ केज तहसील कार्यालयावर दलित समाज बांधवांच्या वतीने आक्रोश मोर्चा काढण्यात आला व तहसीलदार केज यांना निवेदन देण्यात आले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष अण्णा देशमुख व परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी या दोन्हीही घटनेतील आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी. सदर घटनेच्या निषेधार्थ केज शहरासह तालुक्यातील दलित समाज बांधवांच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक केज येथून अक्रोश मोर्चास सुरुवात करण्यात आली. सदर मोर्चा हा मंगळवार पेठ कॉर्नर मार्गे मुख्य रस्त्याने श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे तहसील कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. सदर आक्रोश मोर्चामध्ये नारेबाजी करत आरोपींना तात्काळ अटक करून फाशीची शिक्षा देण्यात यावी या आशयाच्या घोषणाबाजी करण्यात आली. या मोर्चामध्ये दलित समाज बांधवासह इतरही समाजबांध व विविध पक्षातील आणि संघटनेतील पदाधिकारी सहभागी होते. सदर मोर्चा तहसील कार्यालयावर पोहोचल्यानंतर तेथे उपस्थित कार्यकर्ते आणि समाजबांधवांनी मनोगत व्यक्त करून सदर दोन्हीही घटनेचा निषेध व्यक्त केला आहे. या मोर्चामध्ये दलित समाज बांधवासह इतरही समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. दलित समाज बांधवांच्या वतीने तहसीलदार केज यांना लेखी निवेदन दिले या निवेदनात असे म्हटले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोरील संविधान शिल्पलेखाची मोडतोड करून विटंबना करून दलित समाजाच्या भावना दुखावल्या त्या आरोपीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, दिनांक ६ डिसेंबर २०२४ रोजी आवादा एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड मस्साजोग येथील दलित कर्मचारी भगवान सोनवणे यांनै मारहाण केली त्या प्रकरणातील आरोपीस तात्काळ अटक करून कडक शासन करण्यात यावे, मस्साजोगचे सरपंच संतोष अण्णा देशमुख यांचे अपहरण करून त्यांना अमानुषपणे क्रूरतेने मारहाण करून त्यांचा निघृपणे खून करणाऱ्या सर्व आरोपींना फास्टट्रॅक कोर्टामध्ये खटला चालवून फाशीची शिक्षा देण्यात यावी, सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ सूर्यवंशी तसेच मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या परिवारास शासकीय आर्थिक मदत देण्यात यावी, केज तालुक्यातील दलित समाजावर होणाऱ्या अन्याय, अत्याचारांमध्ये दिवसेने दिवस वाढ होत आहे ,त्यामुळे अनुसूचित घटक समाजामध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत आहे तरी मा. तालुका दंडाधिकारी केज यांनी सदर घटनेवर कायद्याचा धाक व प्रशासनाची कडक नजर राहावी यासाठी आपल्या अध्यक्षतेखाली शासन समितीची स्थापना करून त्यामध्ये सामाजिक प्रमुख कार्यकर्त्यांचा समावेश करण्यात यावा. अशी मागणी केज तालुक्यातील दलित समाज बांधवांच्या वतीने करण्यात आली आहे. या लेखी निवेदनावर अशोक गायकवाड, चंद्रकांत खरात सर, लिंबराज गायकवाड, भैय्यासाहेब आरकडे, लखन हजारे,योगेश गायकवाड, सुदेश शिरसट,निलेश साखरे,शरद धीवार,सुनील हिरवे इत्यादी समाज बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संपादकीय....

# पोकळ चर्चा

भारतीय राज्यघटनेचा स्वीकार करून देशाला ७५ वर्षे होत आहेत, त्यानिमित्त संसदेत सध्या चर्चासत्र झडत आहे. लोकसभेतील चर्चेनंतर कालपासून राज्यसभेत या विषयावर चर्चा सुरू झाली. राज्यसभेचे सभागृह हे संसदेचे वरिष्ठ सभागृह समजले जाते. या चर्चेतून संविधानाविषयी सखोल समीक्षा होणे अपेक्षित असताना तेथेही संविधानाविषयी अतिशय पोकळ आणि पक्षीय अविर्भावातील चर्चाच ऐकायला मिळाली. काल चर्चेची सुरुवात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केली. त्यांनी सुरुवातीला जी मांडणी केली त्यातून पुढील भाषणात त्या अधिक सखोल चिंतन करतील अशी अपेक्षा होती, पण त्यांनीही सुरुवातीची काही मिनिटे वगळता नंतर आपला पक्षीय अविर्भावच दाखवला. काँग्रेसने केलेले घटना बदल आणि आणीबाणी यावर त्यांनी प्रचंड तोंडसुख घेतले. निवडणूक प्रचारसभेतील वाटावे असे स्वरूप त्यांच्या या भाषणाला आले. त्यातही नवीन काहीच नव्हते.

देशाच्या घटनेतून देशाला काय मिळाले याची मांडणी अपेक्षित असताना त्यांनी मोदी सरकारने गेल्या दहा वर्षांत काय केले याचाच पाढा वाचला. त्यात मोदी सरकारने ५२ कोटी जनधन खाती उघडली येथपासून सुरुवात करून किती जणांना मुद्रा लोन वाटले हाच नेहमीचा तपशील त्यांनी सादर केला. अर्थमंत्री या नात्याने अर्थव्यवस्थेची सध्या काय अवस्था झाली आहे याविषयी त्या जर सखोलपणे बोलल्या असत्या तर त्यातून काहीतरी हाती लागले असते. देशाचा विकासदर अपेक्षेपेक्षा कमी दराने वाटचाल करीत आहे. देशातील नागरिकांची बचत निम्म्याने घटली आहे. देशातील सोने गहाण ठेवून कर्ज घेणार्यांची संख्या प्रचंड पटीने वाढली आहे. ही सगळी आकडेवारी पाहिली तर देशामध्ये सर्वसामान्य गरीब माणसांची आर्थिक हलाकी किती भयावह पातळीवर गेली आहे याचा अंदाज आपल्याला लावता येतो.

देशात संपत्तीचे असमान वाटप सध्या सुरू आहे. त्यातून प्रचंड प्रमाणात विषमता वाढली आहे. भारतीय संविधानाला हे निश्चितच अपेक्षित नसावे. ही विषमता अलीकडच्या काळात तर इतकी टोकाने वाढली आहे की देशातील ५० टक्के लोकसंख्येकडे देशातील एकूण संपत्तीच्या जेमतेम तीन टक्के इतकीच संपत्ती आहे. काही मोजक्याच लोकांकडे एकूण संपत्तीच्या ४० टक्के इतकी संपत्ती एकवटली आहे. ही आर्थिक विषमता कशी कमी करता येईल या दृष्टीने आता या पुढील काळात सरकार कशी वाटचाल करीत आहे याविषयी अर्थमंत्री बोलल्या असत्या तर ते अधिक बरे झाले असते. हा महत्त्वाचा विषय त्यांनी टाळून, बाबासाहेब आंबेडकर काय म्हणाले, पंडित नेहरूंनी काय चुका केल्या, इंदिरा गांधींनी काय चुका केल्या हा सगळा इतिहास पुन्हा उगाळला. तो उगाळत बसण्यात आज काही अर्थ नाही.

अर्थमंत्र्यांनी जे जे दाखले दिले ते किती फोल आणि असत्य होते याचा तपशील नंतर मल्लिकार्जुन खर्गे यांनी त्यांच्या भाषणातून सादर करीत सीतारामन यांचा प्रतिवाद केला. संविधान स्वीकारल्यानंतर पहिल्याच अंतरिम सरकारमध्ये पहिल्याच वर्षी एक घटना दुरुस्ती केली गेली. त्याचाही मोठा गवगवा सत्ताधारी पक्षाकडून केला गेला. पहिल्याच घटनादुरुस्ती विधेयकात अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणली गेली असा आरोप सत्ताधारी पक्षाकडून केला गेला. त्याचे तपशीलवार विवेचन खर्गे यांनी केले. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सूचनेनुसारच ही घटनादुरुस्ती मांडली गेली होती हे खर्गे यांनी पुराव्यानिशी सभागृहात सांगण्याचा प्रयत्न केला. बाबासाहेब आंबेडकर यांचा काँग्रेसने वारंवार अपमान केल्याचा उल्लेख नेहमीप्रमाणे सत्ताधारी भागांवरून झाला पण, खुद्द बाबासाहेब आंबेडकर यांनी काँग्रेसमुळेच हे सर्वसमावेशक संविधान देशात लागू होऊ शकले याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे असा दाखला त्यांनी दिला.

काँग्रेसच्या आणि अन्य विरोधी पक्षांच्या बाकावरूनही त्यांचे नेहमीचेच आक्षेप उगाळले गेले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयात अनेक वर्षे तिरंगा फडकत नव्हता, तिरंगा ध्वजाला संघाचा विरोध होता, संघाच्या नेत्यांना मनुस्मृतीवर आधारितच संविधान हवे होते, हे संविधान संमत केले गेले तेव्हा मुंबईत संविधानाची प्रत जाळण्याचा प्रकार जनसंघाच्या नेत्यांकडून झाला वगैरे आक्षेपही काँग्रेसच्या बाकावरून घेतले गेले. आज राज्यसभेत झालेल्या चर्चेच्या वेळी 'आप'चे संजय सिंह यांनी नेहमीप्रमाणे जोरदार भाषण करीत भाजपवर हल्लाबोल केला. त्यातून सभागृहात मोठा गदारोळ झालेला पाहायला मिळाला. भाजपच्या सदस्यांनी केजरीवालविरोधी घोषणा दिल्यानंतर त्याला संजय सिंह यांनीही मोदीविरोधी घोषणा देऊन वातावरण आणखीनच स्फोटक केले.

हरियाणा, महाराष्ट्र येथील निवडणुका भाजपने घोटाळे करून जिंकल्या असा आरोप करतानाच असाच घोटाळा करण्याची तयारी भाजपने आता दिल्लीत कशी सुरू केली आहे याची माहितीही संजय सिंह यांनी आकडेवारीनिशी सादर केली. दिल्लीतल्या कोणकोणत्या मतदारसंघातील किती मतदारांची नावे मतदार यादीतून काढून टाकण्याचा घाट भाजपने घातला आहे याची आकडेवारीच त्यांनी सादर केली. त्यातूनही राज्यसभेत गदारोळ सुरूच राहिला. त्याला प्रत्युत्तर म्हणून सभागृह नेते जे. पी. नड्डा यांनी त्यांचे नेहमीचे अस्त्र बाहेर काढत, केजरीवाल सरकारने दिल्लीत बांगलादेशी आणि रोहिंग्यांना आश्रय दिल्याचा आरोप केला. एरवी निवडणूक प्रचाराच्या मैदानात जे वातावरण दिसते तसेच वातावरण राज्यसभेत आणि त्यापूर्वी लोकसभेतही संविधानावरील चर्चेत पाहायला मिळाले. वास्तविक संविधानाला झालेली ७५ वर्षे ही एक चांगली संधी होती आणि त्यातून देशाने सर्वसमावेशक विकास आणि लोकशाहीच्या दृष्टीने नेमकी किती वाटचाल केली याचे परीक्षण होणे अपेक्षित होते. तो हेतू मात्र राज्यसभेतील चर्चेतूनही फारसा साध्य झालेला दिसला नाही.


# आंबेडकर चळवळ आणि बोरांचे झाड..!

बातमी – भारताची राजधानी दिल्ली–जंतर मंतर येथे भारतीय घटनेची प्रत प्रत्यक्ष पोलिसांदेखत जाळली, बातमी – आज महाराष्ट्रात परभणी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोरच असलेली भारतीय संविधानाची प्रतिकृती फोडण्यात आली. बातमी – हैद्राबादेत अनंतकुमार हेगडे ( भाजप खासदार ) याचं भारतीय संविधान बदलणारं वक्तव्य, बातमी – दिल्लीत नव्यानं बांधण्यात आलेल्या संसद भवनात सेंगोल (काठी) ठेवणे. बातमी – नव्या संसद भवनाचे आत उदघाट्नप्रसंगी राष्ट्रपतींना प्रवेश न देता त्यांना संसदेच्या द्वाराबाहेर उभे केले गेले. ह्या सर्व घटना पैशापुढे क्षुल्लक वाटू लागतात. ह्याबाबीचीं चीड येण्या ऐवजी पैशाला गोचिडी सारखी चिकटणारी जनता ओळखून काळ्या पैशाची उधळपट्टी मतें विकत घेण्यासाठी केल्याच्या बातम्या वर्तमानपत्रात, सोशल मीडियावर येऊ लागल्यात. त्याचा निषेधही नोंदविला जातोय. प्रधानमंत्री स्वतः खाणार नाही आणि कुणाला खाऊ देणार नाही (भ्रष्टाचाराबद्दल) असं म्हणत दिल्ली दरबारी बसले आणि स्विस बँक, परदेशात असलेला काळा पैसा आणून प्रत्येक भारतीयांच्या बँक खात्यात पंधरा लाख रुपये जमा केले जातील असंही म्हणाले. परंतु भारतीय अर्थ खात्याचा रिपोर्ट सांगतो की भारताबाहेर काळा पैसा नाहीच आहे. त्यांचा एकदरीत ताळेबंद अहवाल ठिक असल्याचे समजते. इकडे काळा पैसा आपणास मिळेल म्हणून खूश होणारी जनता आहे. तर तिकडे चातुर्वर्ण्यातील पैशात लोळणारी वैश्य परंपरेतील गुजराथी मंडळींनी बँकाकडून मोठ मोठ्या रक्कमा घेऊन तोंड काळे करून भारताबाहेर परदेशात पळून गेलीत. मग नुकत्याच झालेल्या निवडणुकीत मतदारांची मतें विकत घेण्यासाठी वाटण्यात आलेले पैसे कुठून आले ? शिवाय पोलीसांनी धाडीत पकडलेली घबाडं वेगळीच. ह्या पैशाचं पुढे काय होतं हे जनतेला कळायला हवं. नाही का ? तसेच जसं मतदारांना मतांची किंमत मिळते तसे काहीं लोकप्रतिनिधीनाही विकत घेता येते. त्यांना ही खोके देण्यासाठी पैसा जवळ ठेवावा लागतो. याकरिता पैसा मोठ्या कामाचा असतो. हीच खोके घेणारी मंडळी निवडून येतात त्यात आश्चर्य वाटण्यासारखं काहीं नसतं.

आज परभणीत जे प्रकरण घडतंय ते पाहून आम्हास हजारोवर्षे मागास, शुद्र कुणी ठेवले यावर विचार केल्यास त्याचे उत्तर महात्मा फुले यांनी सांगितलेल्या श्लोकात सापडते. ते म्हणतात ––

विद्येविना मती गेली
मतीविना नीति गेली
नीतिविना गती गेली
गतीविना वित्त गेले
वित्ताविना शुद्र खचले

इतके अनर्थ एका अविद्येने केले..! ह्या परभणी प्रकरणाने मागासलेल्या शुद्र लोकांचे लक्ष वेधून घ्यावेसे वाटते. याकरिता हा पंक्तीप्रपंच. हा श्लोक लिहिण्याचा काळ परकीय सत्तेचा. मोगल, पोर्तुगीज, डच, जर्मन, ब्रिटिश, इंग्रज, मराठेशाही, पेशवाई अशा परकीय शासन व्यवस्थेचे आम्ही गुलाम तर हिंदू धर्माचेही गुलाम. त्यामुळे मागासांना शिक्षणाचा अभाव असल्याने समाजातील फार मोठा घटक वर्ग असलेला शुद्र, अतिशूद्र वर्गातील लोक खचल्याचं अचूक निदान महात्मा फुल्यांनी केलं असल्याचे आपण वाचतो. सुवर्ण भारतात सुवर्णकाळातील लोकांना अवर्ण, शुद्र ठरविण्यात आले. ज्यांनी हे केले आज त्यांना सवर्ण संबोधण्यात येते. भारतदेशाला स्वातंत्र्य मिळाले आणि विद्या शिकण्याचा अधिकार स्त्रिया आणि शुद्राला मिळू लागल्याने त्यांची प्रगतीची वाट मोकळी झाली. आज ह्या आपल्या प्रगतीचे जनक महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होत. या वर्गातून अनेक डॉक्टर्स, इंजिनीअर, वकील, उच्च पदाधिकारी, शास्त्रज्ञ्, आमदार, खासदार, लेखक कवी – कवयित्री, प्राध्यापक, साहित्यिक, शिक्षक, मंत्री, कलावन्त, नायक – नायिका, क्रीडाक्षेत्र क्रीडापटू खेळाडू अश्या विविध क्षेत्रात नावलौकिक करीत आहेत. ह्या वाटचालीत दिवसेंदिवस भर पडत आहे. एकदा विचार करून पहा. परकीयांची सत्ता असतांना अशिक्षितांची वाढलेली संख्या तुलनेनं स्वातंत्र्य मिळाल्याने दिवसेंदिवस कमी होत होती आणि कमी होत आहे. अर्थात समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढतंय. ती वाढ खुंटवायची असेल तर ह्या घटकातील नव्या तरुणाईचं करिअर संपुष्टात आणावयाचे. म्हणूनच त्यांना अशा दंगलीत पोलिस केसेस करून त्यांचे भविष्याचं नुकसान (डॅमेज) करायचं अशाप्रकारचे डावपेच ते रचू लागलेत. हे कारस्थान कुणाचे हे आंबेडकर अनुयायांनी चांगलं लक्षात घेतलं पाहिजे. हे एक आपल्याविरुद्धचे कुटील षडयंत्र होत आहे, न्याय मागायचा कोणाकडे की ते विवेकवादी असतील तर सदसदविवेक बुद्धीने न्याय देतील. अशाच लोकांकडूनच न्याय




मिळण्याची शक्यता असते इतरांकडून नाही आणि आम्ही जर पाकीटमार लोकप्रतिनिधी निवडून दिले असतील तर त्यांचेकडून न्यायाची अपेक्षा करता येणे शक्य तरी आहे काय..? आता असंभवास संभव करावयाचे असेल तर चिडलेल्या आंबेडकरवाद्यांनी खरंच आपणास या प्रकरणाची चीड आलेय असं वाटतंय तर आपण सर्व निवडणुकीत पराभवी कां ? झालो. त्याची चीड येत नाही का ? याचा आधी विचार करावा. बोरीच्या झाडाला भरपूर बोरं येतात तेव्हा ती हिरवी असो की पिकलेली असो की कच्ची असो.. त्या झाडाला पोरं लक्ष्य करतात आणि दगडं मारून ती बोरं पाडतात. तर मोठी लांब काठीने पण पाडतात. त्या झाडाची फारशी कुणी मालक दखल घेत नाहीत. हे मी गावाकडं पाहिलेय. बोरं हे फळ तसं इतर फळा पेक्षा क्षुल्लक वाटणारं असतं ना. जशी इतर फळं किंमत मिळवितात तशी ही बोरं किमतीची वाटतच नाहीत. म्हणून, ज्या फळास बाजारात चांगला भाव मिळतो त्या झाडांची देखभाल केली जाते. अन्य नाही. हे सर्वज्ञात आहे. पण...हे उदाहरण मी यासाठी देत आहे की आपली आंबेडकरी चळवळीची स्थिती त्या बोरांच्या झाडांप्रमाणे झालेली आहे. कुणीही कुठूनही येतो अन त्या झाडावर दगडं भिरकवतो. बोरं पाडतो आणि इथेच्छ स्वाद घेतो. ते झाड कुठेही असो, ते रानात असो की रस्त्यावरचे असो, एखाद्याच्या मालकीच्या जमिनीत असो. त्याकडे बेफिकीरनेच पाहिले जाते. त्याप्रमाणे आपणही आंबेडकर चळवळ पाहतो. म्हणूनच ती या अवस्थेत दिसत आहे. डॉ. बाबासाहेबांनी लावलेलं खडकावरच्या झाडाची मात्र नीट जोपासना न केल्यानं ते तर कोलमडून पडलंय. त्या झाडाऐवजी ही बोराची झाडें उगवलीत जिकडेतिकडे. मग बाबासाहेबांनी पाहिलेलं स्वप्न तरी कसे पूर्ण होणार..? अशीच स्थिती यापुढे कायम राहिली तर आता रसाळ, टिकाऊ, कसदार फ़ळाची अपेक्षा पूर्ण करणारी आजची तरुण पिढी बरबाद होण्याचीच शक्यता अधिक आहे. हे आमच्यातल्या विद्वान मंडळीस कळत नाही असे म्हणायचे तरी कसे ? अन डॉ. बाबासाहेबांची अपेक्षा अशी ही ह्यांची बोरांची झाडें पूर्ण करतील काय ? आंबेडक्रवाद्यानो – भावांनो बहिणींनो, परभणीत दंगल पसरतेय. पोलीस कोम्बिंग ऑपरेशन करीत आहेत. सोशल मीडियात बातम्या येत आहेत. थांबा...पूर्वी होता तो विद्या बंदीचा काळ संपलाय, आता विद्यार्जन काळात अडथळे आणण्याची नव्याने सुरुवात झालीय असं दिसतंय. तुम्ही दंगलीत सापडल्यास पुन्हा तुमच्या जीवनात अंधार येईल. ही क्लृप्ती ओळखा, ही लोकशाही आपल्या लोकांची नाही. सावधान ! भावना भावनिकांच्याच भडकतात. हे पक्के वैरी जाणतात म्हणून ते समाजकंटक असं करीत असावेत का ? पण बौद्धानो कृपया तुम्ही हे कृत्य करू नका. सांभाळा स्वतःला. जयभीम..!

***********

मधुकर मोहिते (कवी लेखक) नेरूळ नवी मुंबई

# प्रगत देशांची घटती लोकसंख्या

आज जगाची लोकसंख्या भरमसाठ वाढलेली दिसत असली तरी अनेक प्रगत देशांमध्ये जन्मदरात घट झालेली दिसून येते. त्यामुळे भविष्यात तरुण लोकसंख्येच्या उपलब्धतेची समस्या येईल.

चीनची घटती लोकसंख्या

चीनची लोकसंख्या २०२३ मध्ये २८ लाखांनी घटली. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक संख्येचे वाढते प्रमाण आणि उत्पादनक्षम लोकसंख्येचे घटते प्रमाण असे आर्थिक संकट चीनपुढे उभे आहे. लोकसंख्येचा दर घटत असल्याने २०३०च्या पुढे हा लोकसंख्याशास्त्रीय ताण चीनच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करणार आहेत. या शतकात १५ ते ६४ वयोगटातील चिनी नागरिकांची संख्या ६० टक्क्यांपेक्षा कमी होण्याची शक्यता आहे. बेरोजगारी आणि कमावत्या नागरिकांची घटती संख्या यामुळे उत्पादन व बांधकाम क्षेत्रांत कमालीचा सुस्तपणा आला आहे.

दक्षिण कोरियाचा घटता जन्मदर

एकेकाळी वेगवान आर्थिक वाढ, आधुनिकीकरणासाठी प्रसिद्ध असलेल्या दक्षिण कोरियातील जन्मदर वेगाने कमी होत आहे. २०२३ पासून प्रजनन दरात दिवसेंदिवस घट होत आहे. शतकाच्या अखेरपर्यंत देशाची लोकसंख्या सध्याच्या लोकसंख्येपेक्षा एक तृतीयांशपर्यंत कमी होऊ शकते. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी दक्षिण कोरियाचे सरकार घटत्या जन्मदराच्या समस्येचा सामना करण्यासाठी पालकांना जन्मलेल्या प्रत्येक मुलासाठी १०० दशलक्ष वॉन रोख देण्याचा विचार करत आहे. सध्या, दक्षिण कोरियामधील पालकांना त्यांचे मूल सात वर्षांचे होईपर्यंत विविध प्रोत्साहने आणि समर्थन कार्यक्रमांच्या माध्यमातून ३५ दशलक्ष वॉन आणि ५० दशलक्ष वॉन मिळतात.

दक्षिण कोरियाने जन्मदर वाढवण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. जसे की, बालसंगोपनासाठी परदेशी कामगारांची भरती करणे, कर सवलती देणे आणि ३० वर्षांच्या वयापर्यंत तीन किंवा त्याहून अधिक मुले असलेल्या पुरुषांना लष्करी सेवेतून सूट देणे. परंतु, या प्रयत्नांचा आजपर्यंत मर्यादित परिणाम झाला आहे.



पुनर्बांधणीकरता श्रमजीवींची गरज

आज युरोप, आखाती देशांमध्ये आणि अनेक ठिकाणी युद्ध सुरू आहे, खास तर युक्रेन, इस्रायलमध्ये. तिथे मोठ्या प्रमाणामध्ये पुनर्बांधणी करण्याकरता वेगवेगळ्या श्रमजीवींची गरज आहे, ही गरज भारतच पूर्ण करू शकतो. याचा पुरेपूर फायदा आपण उठवला पाहिजे.प्रगत देशांमध्येसुद्धा वेगवेगळी कौशल्य असलेल्या श्रमजीवींची गरज आहे. त्या त्या देशांना लागणारे कौशल्य पूर्ण कामगार यांचे भारतात ट्रेनिंग देऊन, आपण या देशांची गरज पूर्ण केली पाहिजे. त्याचा फायदा आपल्या तरुणाईला होईल.

जगाची घटती लोकसंख्या

युरोप, चीन आणि जपानमध्येही प्रजनन दर मोठ्या प्रमाणात घटला आहे. चीनमधील प्रजनन दर २०२२ मध्ये १.०९ आणि जपानमधील जन्मदर १.२६ या विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचला आहे. जपानमध्ये २०२३ मध्ये जन्माच्या संख्येपेक्षा मृत्यू झालेल्यांची संख्या दुप्पट असल्याची नोंद करण्यात आली आहे. युरोप, कोरिया, चीन, जपानच्या घटत्या लोकसंख्येचा परिणाम जगाच्या अर्थव्यवस्थेवरही होत आहे.

मात्र भारताकरता ही एक प्रचंड संधी आहे. अनेक वर्षांपासून काम करू शकणार्यांची संख्या अधिक असल्याने जगातील अनेक देशांसाठी भारतामधून कर्मचारी वा कामगार पुरविले गेले होते. भारतामधील कमावत्या वयाची लोकसंख्या जागतिक आर्थिक प्रक्रियेला गती देत आहे. चीनमध्ये कामगारांच्या वाढत्या खर्चाचा सामना करावा लागत असल्याने बर्याच कंपन्यांनी चीनमधून काढता पाय घेतला.

घटत्या लोकसंख्येचे संकट

घटत्या लोकसंख्येचे संकट भारतातसुद्धा पुढच्या काही वर्षांत येण्याची शक्यता आहे. त्यावर गंभीर विचार जरुरी आहे. व्यापक अर्थाने घटता जननदर आणि त्या अनुषंगाने घटती लोकसंख्या हे आव्हान भारता समोर येणार आहे. प्रगत देशांमध्ये स्त्रियांना मिळणार्या स्वातंत्र्यामुळे मूल जन्माला घालण्याविषयी त्यांच्या मताला प्राधान्य आले. एकीकडे नोकरी, व्यवसाय, छंद अशा अनेक क्षेत्रांमध्ये स्वत:ला सिद्ध करण्याचे स्वातंत्र्य आणि दुसरीकडे मूल जन्माला घातल्यानंतर येणार्या स्वाभाविक शारीरिक, सामाजिक जबाबदार्यांमुळे अनेक स्त्रिया मुले नको हा पर्याय स्वीकारू लागल्या आहेत.

भारताने स्वातंत्र्यानंतरच्या लोकसंख्या नियंत्रणाच्या धोरणाचा अवलंब केला. भारताच्या दृष्टीने लोकसंख्या नियंत्रणाचा मुद्दा सर्वांगीण आर्थिक आणि सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने अत्यंत कळीचा होता. १९५० मध्ये भारताचा जननदर– प्रत्येक स्त्रीने जन्माला घातलेली सरासरी मुले– ६.१८ होता, तो १९८० मध्ये ४.८० वर आला. वैद्यकीय संशोधक 'लॅन्सेट' या पत्राने या वर्षी मार्च महिन्यात ही आकडेवारी प्रसृत केली. २०२१ मध्ये जननदर १.९० पर्यंत खाली आला. लॅन्सेटच्या मते, सध्या तो १.२९ पर्यंत आला असून, पुन्हा वर जाणार नाही. २.१ च्या वर जननदर नसेल, तर लोकसंख्येचा र्हास होतो व उत्पादक लोकसंख्याही कमी होते.

काही उपाययोजना

लॅन्सेटच्या अंदाजानुसार, २०५० मध्ये दर पाच भारतीयांमध्ये एक ज्येष्ठ नागरिक असेल. या प्रचंड लोकसंख्येची काळजी घेण्यासाठी पुरेशी युवा लोकसंख्याच त्यावेळी उपलब्ध नसेल. भारतामध्ये आर्थिक विकास साधण्यासाठी अधिक लोकसंख्या हा बोजा न ठरता ते समृद्धीचे साधन ठरू शकते. कारण यातून अधिक उत्पादक हात, अधिक कौशल्य, अधिक क्रयशक्ती, अधिक मागणी होते. लोकसंख्या लाभांशाचा उपयोग चीनने करून घेतला. प्रगतीशील समाजामध्ये मुले जन्माला घालण्याच्या निर्णयप्रक्रियेत महिलांचे स्थान प्राधान्याचे असेल. किती महिला ही वाटचाल स्वीकारतील, असा प्रश्न आहे.

मुले जन्माला घालायची असतील तर आधी तरुण–तरुणींनी लग्न केले पाहिजे. लग्न करण्याआधी हे तरुण–तरुणी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असणे आवश्यक आहे. परंतु गेल्या काही वर्षांत देशात बेरोजगारी वाढलेली आहे. त्यामुळे बेरोजगार तरुणांना लग्नासाठी मुली मिळत नाहीत. परिणामी विवाहेच्छुक मुला–मुलींचे वय वाढत आहे आणि लग्न होत नाही. महागाईदेखील आहे. आरोग्य, शिक्षणावरील खर्च वाढला आहे. या परिस्थितीत लग्न करून, संसार सांभाळून वर दोन–तीन अपत्ये जन्माला घालणे, त्यांना वाढवणे आव्हानात्मक आहे.

तरुणांमधील बेरोजगारी दूर करून, त्यांचे उत्पन्न वाढवून, महागाई सुसह्य करून, आरोग्य, शिक्षण सुविधा उपलब्ध करून अपत्य जन्माला घालण्यास योग्य अशी आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती निर्माण करण्याची गरज आहे. जन्मदर घटण्याचे संकट काही वर्षांनंतर येण्याची शक्यता आहे, तोपर्यंत लोकसंख्या लाभांशाचे अधिकाधिक लाभ पदरात पाडून घेण्याची गरज आहे. देशाचा जन्मदर वाढवण्याकरता वेगवेगळ्या देशांनी विविध उपाय योजना केल्या आहेत. काहीना यश मिळाले आहे. या उपाययोजनांचे विश्लेषण करून भारतासाठी योग्य अशा उपाययोजना येणार्या काळात राबवणे गरजेचे आहे.

# राज्यातील ५००० बांधकाम कामगारांचा नागपूर विधानसभेवर विराट मोर्चा.


लातूर :- मोर्चामध्ये महाराष्ट्र शासनाने बांधकाम कामगारांची बंद केलेली पोर्टल पूर्ववत सुरू करा, स्वतः बांधकाम कामगारांना अर्ज दाखल करण्याची पूर्वीप्रमाणेच सुविधा द्या, राज्यातील २६ लाख बांधकाम कामगारांचे प्रलंबित अर्ज एक महिन्यापेक्षा जास्त काळ झाल्याने ते सर्व अर्ज मंजूर झाल्याचे घोषित करा, कामगार संघटनांना सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशानुसार बांधकाम कामगारांचे काम करण्यास परवानगी द्या, माझी कामगार मंत्र्यांनी जाहीर केल्यानुसार राज्यातील ५४ लाख बांधकाम कामगारांना ५००० रुपये सानुग्रह अनुदान त्वरित देण्याची व्यवस्था करा, बांधकाम कामगारांची घरकुल योजना प्रभावीपणे राबवा, बांधकाम कामगारांना पेन्शन द्या, बांधकाम कामगारांना एखाद्या लागू करा इत्यादी घोषणा कामगार जोरदारपणे देत होते. या मोर्चाचे नेतृत्व बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे मुख्यनिमंत्रण कॉम्रेड शंकर पुजारी, सहनिमंत्रक सागर तायडे, सहनिमंत्रक विनिता बाळेकुंद्री, राजकुमार होळीकर, प्रशांत रामटेके, गणेश उके, प्रशांत मेश्राम, आनंद भालेराव, काशिनाथ नखाते, विशाल बडवे, रत्नपाल डोफे, मंगेश माटे आणि नरेंद्र जारोंडे राष्ट्रीय उपाध्यक्ष स्वतंत्र मजदूर युनियन यांची विशेष उपस्थिती होती. त्यांनी मार्गदर्शन केले. बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृती समितीच्या शिष्टमंडळाच्या वतीने मा.ना.श्री. अतुल सावे मंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदन देण्यात आले. शिष्टमंडळाच्या वतीने मंत्र्यांच्या कडे अशी मागणी करण्यात आली की बांधकाम कामगारास व्यक्तिगत मंडळाकडे नोंदणी करण्यासाठी व लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचा मूलभूत अधिकार आहे तो कायद्यानेच दिलेला असल्यामुळे तो नाकारता येणार नाही जसे आज पासपोर्ट, शॉप क्टची, लायसन्स ड्रायव्हिंग, लायसन्स काढण्यासाठी ऑनलाईन अर्ज घेतले जातात किंबहुना शासन डिजिटल पद्धतीने कारभार करून पाहते त्यामुळे कामगारास ऑनलाइन अर्ज करण्याची सध्या जी बंदी घालण्यात आलेली आहे ती त्वरित उठवण्यात यावी. सर्व प्रलंबित अर्ज त्वरित मंजूर करण्यात यावेत कामगार संघटनांना बांधकाम कामगारांचे काम करण्याबद्दल सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार हक्क मिळावेत. माननीय नामदार श्री अतुल सावे मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी शिष्टमंडळास सांगितले की, सध्या कामगार मंत्री यांची निवड झालेली नसून लवकरच दोन दिवसांमध्ये होईल त्यानंतर व नागपूर अधिवेशन संपल्यानंतर बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृती समिती बरोबर कामगार मंत्री यांच्या बरोबर बैठक लावण्यात येईल व प्रश्न सोडवले जातील. असे त्यांनी आश्वासन दिले. यानंतर मोर्चाच्या जाहीर सभेमध्ये असा निर्णय घेण्यात आला की सध्या सर्वोच्च न्यायालयाने आणि राज्य सरकारने सुद्धा




आदेश दिलेला असल्यामुळे कामगार संघटनांना बांधकाम कामगारांचे अर्ज दाखल करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार दोन दिवसांमध्ये प्रत्येक जिल्ह्यात नोंदणी बद्दल व कल्याणकारी लाभ मिळण्याबद्दलच्या याद्या संबंधी जिल्ह्यातील सहाय्यक कामगार आयुक्त यांच्याकडे द्याव्यात त्यांनी जर तसे काम करण्यास नकार दिल्यास त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र राज्याचे कामगार आयुक्त व प्रधान सचिव यांच्याकडे तक्रार करावी. असे ठरवण्यात आले. महाराष्ट्र शासनाने तारीख ९ सप्टेंबर २०१४ रोजी असा आदेश केलेला आहे की बांधकाम कामगारांचे सर्व अर्ज एका महिन्यात निकाली काढावेत परंतु राज्यातील २६ लाख बांधकाम कामगारांचे अर्ज मागील एक वर्षापासून प्रलंबित असल्यामुळे हे सर्व अर्ज मंजूर केल्याचे शासनाने जाहीर करावे व त्याचे आवश्यक तपासणी करावी असेही ठरवण्यात आले.मोर्च्याच्या जाहीर सभेचे सूत्र संचालन गणेश उके यांनी केले तर प्रशांत रामटेके यांनी आभार मानले.

## तणाव दूर करण्यासाठी ही थिअरी करेल तुम्हाला मदत; दिवसातून दोन ते तीन मिनिटे करा 'ही 'गोष्ट, वाचा, डॉक्टरांचे मत

दिवसेंदिवस बदलणाऱ्या जीवनपद्धती आणि प्रत्येक क्षेत्रातील स्पर्धेमुळे वाढत जाणारा ताण यांमुळे आरोग्याचे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. विशेषत: मोठ्या शहरात राहणाऱ्या नोकरदारांमध्ये कंबरदुखी, पाठदुखी व डोकेदुखीची समस्या वाढत आहे. त्यावर उपाय म्हणून आपण वेदनाशामक बाम, स्प्रे आदी अनेक गोष्टींचा उपयोग करतो. पण तुम्हाला माहीत आहे का की, तुम्ही तुमचा तणाव झटकून टाकू शकता क्लिनिकल मानसशास्त्रज्ञ डॉक्टर सलीहा आफ्रिदी यांनी, फिरणे आणि हलणे (हालचाल करणे) यांमुळे शरीराला तणावमुक्त होण्यास मदत मिळू शकते , असा दावा केला आहे. 'द मेंटल हेल्थ क्टिविस्ट' यांनी शेअर केले की, तुम्ही तुमच्या शरीराच्या अवयवांची हालचाल जरी केली तरी तणावापासून मुक्त होण्यास मदत करू शकते. कारण- आपल्या शरीरात खूप ताण आणि तणाव असतो. पण, आपल्याला हे माहीत नसते. उदाहरणार्थ- जेव्हा तुम्ही एखादा प्राणी बघता तेव्हा घाबरता किंवा तुमचे शरीर थरथर कापते. त्यामुळे तर या सगळ्यावर उपाय म्हणून तुमचा दिवसाची सुरुवात शरीराच्या अवयवांची हालचाल करून करा, असे तुम्ही तीन मिनिटे करू शकता. शरीर झटकून टाकल्यामुळे तुम्हाला खूप आराम मिळेल, असे डॉक्टर आफ्रिदी यांनी 'द बॅलन्स थिअरी पॉडकास्ट'वरील संभाषणात सांगितले आहे.



हा उपाय काम करेल का?

तर याबद्दल जाणून घेण्यासाठी, दी इंडियन एक्स्प्रेसने, हैदराबाद येथील अपोलो हॉस्पिटल्सच्या सल्लागार न्यूरोलॉजिस्ट डॉक्टर सुधीर कुमार यांच्याशी चर्चा केली. तेव्हा त्यांनी सांगितले की, 'शेक इट ऑफ' ही थिअरी ताण आणि टेन्शन दूर करण्यासाठी खूप प्रभावी आहे. दैनंदिन हालचालींमध्ये दीर्घकाळ बसणे आणि शारीरिक इनक्टिव्हिटी यांचा समावेश होतो. कॉम्प्युटरवर काम केल्याने जास्त वेळ मानेच्या आणि पाठीच्या खालच्या स्नायूंवर ताण येतो. परिणामी, जेव्हा दिवस संपतो तेव्हा स्नायू ताठ, तणावग्रस्त होतात. म्हणून शरीराचे वेगवेगळे अवयव कमी कालावधीसाठी (तीन ते पाच मिनिटे) हलवल्याने स्नायूंना आराम मिळतो आणि तणाव कमी होतो, असे डॉक्टर कुमार यांनी स्पष्ट केले आहे.

फरिदाबाद येथील फोर्टिस हॉस्पिटलच्या डायरेक्टर, न्यूरोलॉजी, डॉक्टर विनीत बंगा यांनी, 'शरीराच्या अवयवांची हालचाल करणे' तणाव दूर करण्यासाठी आणि मज्जासंस्था रीसेट करण्यासाठी 'एक प्रभावी आणि गैरआक्रमक मार्ग' असू शकतो. तेव्हा तणाव व्यवस्थापनासाठी एक नैसर्गिक उपाय आहे.

जेव्हा ताण येतो तेव्हा शरीर फाईट किंवा फ्लाइट मोडमध्ये प्रवेश करते, ज्यामुळे स्नायूंवर ताण येतो. शरीराचे अवयव हलणे किंवा हलवणे हे पॅरासिम्पेथेटिक मज्जासंस्था सक्रिय करते. त्यामुळे शरीराला आराम मिळेल किंवा शरीराला पुनर्प्राप्तीसही मदत मिळू शकते. ही पद्धत पेन्ट-अप एनर्जी, रक्ताभिसरण सुधारण्यास आणि कॉर्टिसोल यांसारखे तणाव संप्रेरक कमी करण्यास मदत करू शकते. कालांतराने हा सराव अधिक संतुलित मज्जासंस्थेला समर्थन देऊ शकते; ज्यामुळे चांगले इमोशनल रेग्युलेशन होऊन चिंता करण्याची पातळी कमी होते, असे डॉक्टर विनीत बंगा म्हणाले आहेत.

डॉक्टर कुमार यांच्या मते, 'शेक इट ऑफ' ही थिअरी क्टिवेट्स पॅरासिम्पेथेटिक मज्जासंस्था सक्रिय करते आणि मेंदूला शांत होण्यासाठी, आराम देण्यास आणि काही गोष्टी सोडून देण्याचे संकेत देते.

शरीराच्या अवयवांच्या हालचाली मूड सुधारू शकतात आणि तुमच्यातील सकारात्मकता वाढवू शकतात. शरीराच्या अवयवांच्या हालचाली किंवा कंपनांमुळे स्नायूचा ताण सुटण्यास, अतिरिक्त ड्रेनालाईन जळण्यास आणि मज्जासंस्थेला शांत करण्यास मदत करतात, ज्यामुळे शरीरातील तणावाची पातळी नियंत्रित होते. शेकिंग थेरपी बसून किंवा उभे राहून केली जाऊ शकते. फक्त शरीराच्या विशिष्ट भागांवर लक्ष केंद्रित करा आणि शरीराच्या अवयवांना हलवण्याचा प्रयत्न करा, असे डॉक्टर कुमार म्हणाले. या सगळ्या गोष्टींसाठी तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.

## मसाबा गुप्ता हिवाळ्यात नाश्त्यामध्ये खाते बाजरीचे धिरडे; जाणून घ्या तज्ज्ञांकडून याचे फायदे

ज्येष्ठ अभिनेत्री नीना गुप्ता यांची लेक, लोकप्रिय अभिनेत्री, फॅशन डिझायनर मसाबा गुप्ता ही सोशल मीडियावर फिटनेसविषयी नवनवीन माहिती शेअर करते आणि आहार, व्यायामाविषयी माहिती सांगते. नुकतेच तिने हिवाळ्यातील नाश्त्याविषयीची माहिती सांगत एक पोस्ट शेअर केली आहे.

इन्स्टाग्राम स्टोरीवर बाजरीच्या धिरड्याचा फोटो शेअर करत मसाबाने लिहिलेय, हिवाळ्यातील नाश्ता- भोपळा, बाजरी, तीळ, पालक, मिरची, आले व लसणाचा समावेश असलेल्या बाजरीचे धिरडे.

बाजरी व भोपळ्याचा नाश्त्यामध्ये समावेश करणे तुमच्यासाठी कसे फायदेशीर?

गुरुग्राम येथील नारायण हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ मोहिनी डोंगरे सांगतात, बाजरी आणि भोपळा हिवाळ्यात आरोग्यासाठी पोषक आहे. बाजरीमध्ये पौष्टिक घटक आहेत आणि भोपळा ही हंगामी पौष्टिक भाजी आहे. त्या सांगतात, बाजरीचे धिरडे हा भारतीय पारंपरिक पदार्थ शरीरासाठी उबदार आणि चविष्ट आहे; पण त्याचबरोबर हिवाळ्यात याचे सेवन आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर ठरते.

बाजरीच्या सेवनाचे फायदे

बाजरी हे पौष्टिक घटकांनी समृद्ध धान्य आहे; ज्यामध्ये भरपूर प्रमाणात फायबर आणि खनिजे असतात. बाजरीचे सेवन केल्याने ऊर्जा स्थिर राहून, हिवाळ्यातही शरीराला ऊब मिळते.

बाजरीचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये मॅग्नेशियम आहे. शरीराच्या तापमानासह अनेक शारीरिक कार्यांमध्ये मॅग्नेशियम महत्त्वाची भूमिका बजावते. पटपरगंज येथील मॅक्स सुपर स्पेशॅलिटी हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ ज्योती खनिओझ सांगतात, बाजरीतील खनिजे शरीरातील रक्ताभिसरण आणि ऑक्सिजनचा प्रवाह सुधारण्यास मदत करतात; ज्यामुळे शरीराला ऊब मिळते. त्यामुळे हिवाळ्यात बाजरी हा एक उत्तम पर्याय ठरतो

भोपळ्याच्या सेवनाचे फायदे

मोहिनी डोंगरे सांगतात, बाजरीबरोबर भोपळ्याचे सेवन अधिक फायदेशीर ठरते, जे शरीराला अ व क जीवनसत्त्व पुरविते. ज्यामुळे हिवाळ्यात शरीराला रोगप्रतिकार शक्ती टिकवून ठेवण्यास मदत होते.

ज्योती खनिओझ सांगतात, निरोगी त्वचा आणि डोळ्यांच्या चांगल्या आरोग्यासाठी अ जीवनसत्त्व खूप महत्त्वाचे आहे. हिवाळ्यात थंडीमुळे त्वचा आणि डोळ्यांच्या आरोग्यावर परिणाम झाल्याचे दिसून येते. हिवाळ्यात लोकांना सर्दी आणि इतर संसर्ग होण्याची भीती असते तेव्हा क जीवनसत्त्व हे रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते

बाजरी आणि भोपळा

तसेच बाजरी आणि भोपळा यांचे मिश्रण पचनास फायदेशीर आहे. त्याचे सेवन केल्याने हिवाळ्यात पचनाशी संबंधित समस्या दूर होते. डोंगरे सांगतात, बाजरीतील फायबरमुळे आतडे निरोगी राहते.

ज्योती खनिओझ यांच्या मते, बाजरी आणि भोपळ्याच्या सेवनाने ग्लायसेमिक इंडेक्स कमी होतो, जो रक्तातील साखरेची पातळी स्थिर ठेवण्यास मदत करतात.

## मस्साजोग येथील युवा सरपंच स्व. संतोष देशमुख खुनातील आरोपी विष्णू चाटे एलसीबी केले अखेर चतुर्भुज.

### नेमकं प्रकरण काय ?

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष पंडितराव देशमुख यांचे ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण झाल आणि त्यानंतर त्यांची निघृणपणे हत्या करण्यात आली. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर केज आणि मस्साजोग या ठिकाणी आंदोलन करण्यात आले. संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांसह मस्साजोगच्या ग्रामस्थांनीही या हत्या प्रकरणाचा लवकरात लवकर तपास करुन आरोपींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यानंतर आता हा मुद्दा राज्यासह संसदेच्या हिवाळी अधिवेशनात गाजताना दिसत आहेत.

### कोण आहे विष्णू चाटे

विष्णू चाटे हा केज तालुक्यातील कवडगावचे पूर्वी सरपंच होता. त्यानंतर विष्णू चाटे याला अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे केज तालुकाध्यक्ष बनवण्यात आले होते. मात्र सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात सह आरोपी करण्यात आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमधून त्याला निलंबित करण्यात आले. विष्णू चाटे हा धनंजय मुंडे समर्थक असून तो वाल्मीक कराड याचा निकटवर्तीय समजला जातो. विष्णू चाटे याच्यावर हत्येचा कट रचल्याचा आरोप आहे.

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आता मोठी माहिती समोर आली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी विष्णू चाटे याला पोलिसांनी ताब्यात घेतल आहे. त्यामुळे हत्या प्रकरणातील आरोपींची संख्या आता चारवर गेली आहे. विष्णू चाटे हा हत्या आणि खंडणीमधील आरोपी असल्याने त्यांच्या विरोधात केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. विष्णू चाटे याच्यावर हत्येचा कट रचल्याचा आरोप आहे. विष्णू चाटे हा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा तालुकाध्यक्ष होता. मात्र पक्षातून त्याचे निलंबन करण्यात आले आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ही कारवाई केली आहे. सरपंच संतोष देशमुख यांचा खून ९ डिसेंबर २०२४ रोजी झाला होता. आज नवव्या दिवशी विष्णू चाटे याला पकडण्यात पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी सुदर्शन घुलेसह इतर आरोपी अद्याप फरार आहेत.मस्साजोग ता. केज येथील सरपंच संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर २०२४ रोजी केज जवळील टोल नाक्यावरून अपहरण झाल होत. त्यानंतर त्यांचा खून करण्यात आला. दरम्यान अपहरणानंतर विष्णू चाटे हा मयत देशमुख यांचे



भाऊ धनंजय देशमुख यांच्या संपर्कात होता. तुमच्या भावाला आणून सोडायला लावतो असे तो मोबाईल दूरध्वनी वरून दोघात झालेल्या संवादामध्ये सांगत होता असे नातेवाईक व नागरिकांत सांगण्यात येत आहे व तशी चर्चा आहे. मात्र, अपहरणानंतर केज पोलिसांनी गुन्हा नोंद करण्यास विलंब केला. संतोष देशमुख यांचा मृतदेह आढळल्यानंतर सुदर्शन घुले, प्रतिक घुले, सुधीर सांगळे, जयराम चाटे, महेश केदार, कृष्णा आंधळे यांच्यावर गुन्हा नोंद झाला. मात्र, या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करावी शिक्षा करावी, या मागणीसाठी मस्साजोग ग्रामस्थांसह केज तालुक्यातील नागरिकांनी दिनांक ९ डिसेंबर रोजी रात्रीपासून ते १० डिसेंबर रोजीच्या रात्रीपर्यंत आंदोलन केले होते. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचा केज तालुकाध्यक्ष असलेल्या विष्णू चाटेवरही गुन्हा नोंद झाला होता.

## काय सांगता! रोगांपासून संरक्षणासाठी शेतकऱ्यांची पिकांवर दारूची फवारणी

उत्तर प्रदेशातील बुलंदशहर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी एक विशेष तंत्र अवलंबले आहे, जे त्यांच्या बटाटा पिकाच्या उत्पादनात उपयुक्त ठरत आहे. बुलंदशहर जिल्ह्याती शिकारपूर तालुक्यातील बोहीच गावातील शेतकरी बटाटा पिकांवर कीटकनाशकांसह दारूची फवारणी करत आहेत.. ही प्रक्रिया गेल्या काही वर्षांपासून शेतकऱ्यांमध्ये चर्चे चा विषय ठरली असून त्याचे परिणामही चांगलेच दिसून येत आहेत. बटाटा पिकासाठी दारू फवारणीचे अनेक फायदे होत असल्याचे शेतकरी सांगतात. सर्वात मोठा फायदा म्हणजे दारूमुळे बटाटा पिकाचे हिवाळ्यापासून संरक्षण होते आणि त्याचा आकार वाढतो. तसेच, बटाटा कोणत्याही प्रकारच्या रोगाचा प्रभाव कमी करतो, विशेषतः हिवाळ्यात. अल्कोहोल फवारणी केल्याने बटाट्याचा रंग स्वच्छ आणि चमकदार राहतो, ज्यामुळे त्याचा दर्जाही वाढतो. बोहीच गावातील शेतकरी राम बाबू शर्मा सांगतात की, आम्ही गेल्या चार-पाच वर्षांपासून बटाटा पिकांवर दारू फवारणी करत आहोत आणि त्याचा आम्हाला खूप फायदा झाला आहे. यामुळे बटाट्याचा आकार वाढतो आणि तुषारचा प्रभावही कमी होतो. आम्ही सुमारे २०० मिली अल्कोहोल औषध मिसळून एक एकर (६ बिघा) मध्ये फवारतो आणि आजपर्यंत आम्हाला कोणताही नकारात्मक परिणाम दिसून आलेला नाही. शेतकरी कांचनकुमार शर्मा म्हणाले की, दारू फवारणी केल्याने बटाट्याचा आकार सुधारतो आणि तो घट्ट होतो.

## पुरुषहो! कधीही पडणार नाही टक्कल, फक्त असा करा कांद्याचा वापर, रातोरात हेअरफॉल थांबून येतील नवे केस

आजकाल केसगळती ही एक सामान्य समस्या बनली आहे. केसगळतीची ही समस्या फक्त महिलांनाच नाही तर पुरुषांनाही हैराण करून सोडत आहे. सध्या हिवाळ्याचा ऋतू सुरु आहे, या ऋतूत केसगळतीच्या समस्या दुपटीने वाढू लागतात. वय, हार्मोनल बदल, ताणतणाव आणि पर्यावरणीय घटक यामुळे ही समस्या आणखी वाढते. आपले केस हे आपल्या सौंदर्यात भर पाडत असतात, त्यामुळे यांची विशेष काळजी घ्यायला हवी. केसगळती थांबवण्यासाठी एक सोपा आणि घरगुती उपाय म्हणजे कांद्याचा रस. कांद्याचा रसाचा नियमित वापर केल्याने केसगळती थांबते आणि केसांची वाढ सुधारते. यामुळे केस माजीबूत होऊन केसांना पोषण देखील मिळते. आज या लेखात आपण केसांसाठी कांद्याचा रसाचा कसा वापर करायचा ते जाणून घेणार आहोत.

खोबरेल तेल आणि कांद्याचा रस

खोबरेल तेल टाळूच्या त्वचेसाठी फायदेशीर असते. यामध्ये अँटीफंगल आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात. तुम्ही खोबरेल तेल कांद्याच्या रसात मिसळून टाळूवर मसाज करू शकता. यामुळे केसांची मूळ मजबूत होतील आणि केसगळती देखील बंद होईल. याच्या नियमित वापराने केसांची शाइन सुधारते आणि पांढरे केसही कमी होऊ लागतात.


मध आणि कांद्याचा रस

हिवाळ्यात केस रफ आणि रुक्ष होतात. यामुळे बहुतेक लोक या केमिकलयुक्त शॅम्पू आणि जेलचा वापर करतात. मात्र यामुळे केसांचे नुकसान होऊ शकते. केसांच्या या समस्येला दूर करण्यासाठी तुम्ही घरीच मध आणि कांद्याच्या रसाचे मिश्रण तयार करू शकता. मधामुळे टाळूला पोषण मिळते आणि केसांची वाढ सुधारते. यामुळे केस मऊ, चमकदार आणि चांगले वाढतात.

कोरफड आणि कांद्याचा रस

कोरफड हा केसांसाठी तसेच त्वचेसाठी एक रामबाण उपाय आहे. कोरफडीचा गर त्वचेला शांत करते आणि केसांची वाढ चांगल्या रीतीने वाढवते. कांद्याच्या रसात कोरफडीचा गर मिसळून टाळूला आणि केसांना लावल्यास केसगळती आणि कोंड्याची समस्या दूर होते. याच्या वापराने केस घनदाट, मुलायम आणि चमकदार बनतात.

पिवळ्या धम्मक टाइल्स क्षणार्धात होतील साफ फक्त या घरगुती पदार्थांचा वापर करा, २० रुपयांत घर होईल चकाचक



कांद्याचा रस केसांना कसा लावावा?

कांद्याचा रस थेट केसांवर लावता येतो. यासाठी एक कांडा घ्या आणि याचे तुकडे करून मिक्सरच्या भांड्यात टाका. यानंतर याची एक बारीक पेस्ट तयार करून घ्या. ही तयार पेस्ट एका सुती कपड्यात टाकून चांगली पिळून घ्या. आता तयार कांद्याचा रस एका हवाबंद डब्यात भरून घ्या. आता हा रस हातांच्या साहाय्याने संपूर्ण केसांवर आणि टाळूवर लावा किंवा मसाज करा. काही तास हा रस केसांवर तसाच राहूद्या आणि मग शॅम्पूने केस धुवून टाका.

टीप - ही माहिती केवळ वाचनाकरिता देण्यात आली आहे. कोणताही दावा आम्ही करत नाही. संकेतस्थळांवरून अभ्यास करून मिळालेल्या माहितीनुसार ही माहिती असून वाचकांच्या ज्ञानात अधिक भर घालण्याचा हा प्रयत्न आहे.

# माता रमाई घरकुल योजनेतील थकीत हप्त्यासाठी मनपा आयुक्तांनी लावलेली सक्ती कर भरणा जाचक अट रद्द करा. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्याना बाबासाहेब बनसोडे यांनी दिले निवेदन.

लातूर/ प्रतिनिधी :- अनुसुचित जाती नवबौद्ध घटकातील कच्चे घर असणाऱ्या नागरिकांचे पक्या घराचे स्वप्न पूर्ण व्हावे या उदार्थ हेतूने केंद्र शासन/महाराष्ट्र शासन समाज कल्याण विभागाकडून माता रमाई आंबेडकर आवास योजनेतून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून २०१२ पासुन सदरील योजना कार्यान्वित करण्यात आली या योजनेतून लातूर शहरात अंदाजे ३५०० हजार लाभार्थ्यांना पक्या घराचा लाभ मिळाला आहे.

प्रलंबित अर्ज मंजूरी करीता लातूर शहर महानगर पालिकेकडून १०० टक्के कर भरणा भरूनच अर्ज मंजूर केलेले आहेत.या मंजूर अर्ज लाभार्थींना अचार संहिता व विविध कारणाने घरकुल बांधकामाचे हप्ते प्रलंबित ठेवण्यात आले आहेत वर्तमान काळात सदरील योजनेतील प्रलंबीत हप्ते मिळावेत जेणे करून अर्धवट राहिलेले बांधकाम पुर्ण करण्या हेतून लाभार्थी लातूर शहर महानगर पालिकेत खेटे मारीत आहेत संबंधीत अधिकाऱ्या कडून चालू वर्षाचा कर भरणा व



पुर्वी जल जीवन प्राधिकरण यांच्या कडे थकित मनमानी नागरीकांना आलेली पाणी पट्टी पुर्ण भरणा करण्याची जाचक अट लादली जात आहे.सदरील योजना स्थानिक स्वराज्य संस्थे मार्फत राबवली जात असतना कर भरणा सक्तीचा नसताना सुद्धा संबंधित आधिकाऱ्याकडून लाभार्थांना कर भरण्याची सक्ती/जाचक अट लादली जात आहे.

माता रमाई घरकुल योजनेतील थकीत हप्त्यासाठी मनपा आयुक्तांनी लावलेली सक्ती कर भरणा जाचक अट रद्द करावी या उद्देशाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जनहित युवा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे यांनी दिले निवेदन. या निवेदनावर दिलेल्या अर्जानुसार तात्काळ कार्यवाही नाही झाल्यास येणाऱ्या पुढील काळात लोकशाही मार्गाने मोठे आंदोलन करण्यात येईल असे सांगण्यात आले.

## अनुभवाची सावली संकटाच्या उन्हातही तुमच आयुष्य करपू देत नाही..! समाजभूषण : उत्तमराव तरकसे

ठाणे :- नागसेन बुक डेपो कल्याण आयोजित विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित मुक्ती कोण पथे हे पुस्तक घराघरात अभियानाअंतर्गत फुले, शाहू, आंबेडकर साहित्य महोत्सव आयोजित करण्यात आल्याने सदरचा कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक मैदान महात्मा फुले चौक छाया टॉकीज च्या समोर मुरबाड रोड कल्याण येथे मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटक मा. रमेश मोरे (सर) स्वागत अध्यक्ष मा. राजू बाळतकर (सचिव बोधी नाट्यपरिषद) प्रमुख वक्ते किरण माने ( सुप्रसिद्ध मराठी सिनेअभिनेते शाहू फुले आंबेडकरी विचार प्रसारक ) तसेच समाजभूषण मा. श्री उत्तमराव दासु तरकसे आसरडोहकर (शासनाच्या समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक विचारवंत) हे देखील सदर कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहिल्याने त्यांनी आपले मनोगत मांडताना अनुभवाची सावली संकटाच्या उन्हातही तुमचे आयुष्य करपू देत नाही..! अशाप्रकारे मोलाचे विचार मांडत आपले नुकतेच प्रकाशित झालेले शाहीची नोंद काव्यसंग्रह मराठी सिने अभिनेता किरण माने यांना सप्रेम भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला, तसेच बा... भीमास (सादरकरते) प्रा. प्रशांत मोरे सिनेपार्श्वगायक) यांनी व प्रबोधन कला मंचच्या शाहीर शितल भंडारे यांनी सुद्धा बाबासाहेबांवरील



गाणे सादर करत माहोल अगदी भिममय करून टाकला होता,

सदर कार्यक्रमाकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदान चाहते श्रोत्यांनी व भीम अनुयायांनी फुलून गेले होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन नागसेन बुक डेपोचे संचालक मा. सोमनाथ भोसले यांनी अति उत्कृष्टपणे पार पाडले नंतर कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रगीत गाऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## ६ वर्षांनंतर काम सुरू आणि लगेच बंद : धुळीमुळे नागरिक झाले त्रस्त, किनवट शहरात राष्ट्रीय महामार्गाचा झाला खेळखंडोबा

### सात वर्षे लोटली महामार्ग झालाच नाही

२३ ऑक्टोबर २०१७ रोजी मोठा गाजावाजा करत नांदेड, भोकर, हिमायतनगर, किनवट, माहूर, धनोडा राष्ट्रीय महामार्ग क्रं.१६१ ए चे भूमिपूजन झाले होते. भूमिपूजन झाल्यानंतर एक वर्षे साधा हातही लावण्यात आला नाही.

सात वर्षे लोटली तरी महामार्ग पूर्ण झालेला नाही. पाणी आणि धूळ यामुळे धूळ पहायची असेल तर चला तर मग किनवट मागनि अशी म्हणण्याची वेळ आली आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

किनवट/शेख शौकत :-किनवट शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रं.१६१ ए चा खेळखंडोबा झाला आहे. गेल्या सहा वर्षांपासून किनवट शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते जिजामाता चौक ते अशोक स्तंभदरम्यान ठप्प असलेले काम ऑक्टोबर महिन्यात पहिल्या सप्ताहात माती भरावाचे काम सुरू झाले. परंतु दोनच दिवसांत ते अचानक बंदही झाले. ते अजूनही सुरू झाले नसल्याने धुळीची समस्या कायम आहे. धुळीमुळे या महामार्गाने येजा करणाऱ्यांना कोरड्या ठसक्याने हैराण करून सोडले आहे. अलर्जी असणारे तर जाम त्रासले आहेत. किनवट शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गामुळे शहराच्या वैभवात मोठी भर पडली. पण पैनगंगा अभयारण्य इको सेन्सेटीव्ही झोनची सबब पुढे करून ३० मीटर रुंदीऐवजी १८ मीटर रुंदीचा महामार्ग करण्यात आला. कोर्टाच्या आदेशानुसार तब्बल सहा वर्षाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते जिजामाता चौक, अशोक स्तंभ महामार्गाचे सब ग्रेड (मुरूम भराव) चे काम ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या सप्ताहात हाती घेतले. त्यामुळे धुळीने व महामार्गावरील नळ योजनेच्या लिकेजच्या पाण्याने त्रस्त झालेल्या वाहनचालकाचा व वाटसरूंचा जीव भांड्यात पडला होता. मात्र, दोन दिवस काम करून खोदलेला महामार्ग परत बुजवण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते जिजामाता चौक आणि अशोक स्तंभ या मार्गाने प्रवास करणे म्हणजे धुळीच्या साम्राज्यातुन जनतेची वाटचाल असेच म्हणावे लागेल. शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते आयप्पा स्वामी मंदिर हा महामार्ग केवळ चारशे मीटर तंतोतंत ३० मीटर रुंदीचा झाला. त्यापुढे मात्र रुंदीत मोठी घट झाली. तर नालीनेही नागमोडी वळण घेतले. महामार्गाने बसस्थानकाजवळ शंभर फूट रुंद महामार्ग करण्याला स्कोप असतानाही जागा सोडून काम का केले असावे? हे न उलगडणारे कोडेच आहे.

## शहीद अहेमद खान पठाण कृती समितीच्या वतीने सोमनाथ सूर्यवंशी यांना श्रद्धांजली

लातूर :- शहीद अहेमद खान पठाण कृती समिती तर्फे दिनांक १७-१२ -२४ मंगळवार रोजी सायंकाळी७.३० वाजता अब्दुल कलाम चौक,शहीद अहेमद खान पठाण मार्ग ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक पर्यंत कँडल मार्च काढून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात.संविधान प्रेमी कालकथीत सोमनाथ व्यंकट सूर्यवंशी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.यावेळी व्ही एस पँथर चे सं,अध्यक्ष विनोदजी खटके,नगरसेवक,इम्रान सय्यद,नगरसेवक तबरेज तांबोळी,मुस्लिम विकास परिषदचे मोहसीन खान, ड, मुस्ताकजी सौदागर,ब्ल्यू पँथर चे सं,अध्यक्ष साधू भाऊ गायकवाड,भीम आर्मीचे अक्षय भाई




ढावारे,उमेशजी कांबळे,शहीद अहेमद खान पठाण कृती समितीचे सय्यद सरफराज,इस्माईल शेख, तोसिफ शेख,तन्वीर शेख,कासिम शेख,सोहेल शेख, बिलाल शेख,आय्याज करपुडे,सय्यद सलीम,इस्माईल फुलारी,मुख्तार शेख आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

## भुजबळांच्या अस्मितेला धक्का; राष्ट्रवादीतील अस्वस्थतेची पाच कारणे

नाशिक : विशेष प्रतिनिधी जहां नही चैना, वहां नही रहेना, असं म्हणत छगन भुजबळ यांनी आपल्या अस्वस्थतेला वाट मोकळी करून दिली. आता छगन भुजबळ राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी देणार का? अशी चर्चा रंगली आहे. भुजबळ यांनी नागपूर अधिवेशन सोडून तडक नाशिक गाठले आणि आपल्या समर्थकांशी चर्चा सुरू केली. त्यामुळे भुजबळ पक्ष सोडण्याच्या तयारीत असल्याचे सांगितले जात आहे. छगन भुजबळ नेमके नाराज का झाले? फक्त मंत्रिपद मिळालं नाही म्हणून नाराज आहेत का? कोणती अशी कारणे आहेत ज्यामुळे भुजबळ नाराज झाले? त्याविषयी हे विश्लेषण

राज्यसभेला संधी नाकारली राष्ट्रवादीच्या फुटीनंतर छगन भुजबळ हे अजित पवार यांच्यासोबत खंबीरपणे उभे राहिले. त्यानंतर राज्यसभेची निवडणूक लागली. राष्ट्रवादीकडून दोन उमेदवार राज्यसभेवर जाणार होते. त्यामुळे भुजबळ यांनीही राज्यसभेवर जाण्याची इच्छा व्यक्त केली. मात्र, अजित पवार यांनी त्यांची पत्नी सुनेत्रा पवार यांना राज्यसभेवर पाठवले. दुस-या जागेवर नितीन पाटील यांना संधी दिली. त्यामुळे भुजबळ नाराज झाले होते. लोकसभेची केली तयारी अन् भुजबळांच्या नाराजीचे दुसरे कारण म्हणजे त्यांना लोकसभा निवडणूक लढविण्याचे पक्षाने आदेश दिले.

## लातूर येथील सुमित सुरेश कोकरे यांची नॅशनल क्रिकेट टीम मध्ये निवड

लातूर :- पॅसिफिक फिडर ग्राउंड हिंगणघाट जिल्हा वर्धा येथे वयोगट १९ वर्ष मध्ये राज्यस्तरिय शालेय क्रिकेट स्पर्धे दरम्यान दि ११ डिसेंबर ते २४ डिसेंबर साठी पॅसिफिक फिडर ग्राउंड हिंगणघाट जिल्हा वर्धा येथून लातूर येथील सुमित सुरेश कोकरे यांची नॅशनल क्रिकेट टीम मध्ये निवड झाल्याने त्याचे नातेवाईकांकडून आणि मित्रपरिवारांकडून विशेष कौतुक करुन त्याचे अभिनंदन ही करण्यात येत आहे.या केलेल्या चांगल्या कामगिरीसाठी त्याचे मार्गदशक कोच



आशिष सुर्यवंशी, विकात्त निरफळ ,रोहन हनाडले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.तसेच उदयगिरी डॉलेज-उदगीर येथील माननीय प्राचार्य श्री माडे सरांच ही मोलाचे मागदर्शन लाभले त्यांनी त्याचे स्वागत करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या सोबत सचिव नागराळे सर

## अभाविप देवगिरी प्रांताचे ५९ वे प्रदेश अधिवेशन ; मान्यवरांच्या हस्ते पोस्टरचे प्रकाशन

लातूर/प्रतिनिधी :- अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या देवगिरी प्रांताचे ५९ वे प्रदेश अधिवेशन जानेवारी महिन्यात लातूर नगरीत संपन्न होत आहे.या अधिवेशनाच्या पोस्टरचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.




लातूर ही शिक्षणाची पंढरी म्हणून प्रसिद्ध आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून विद्यार्थी शिक्षणासाठी येथे येत असतात.या नगरीत दि. २ ते ४ जानेवारी २०२५ दरम्यान अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे ५९ वे प्रदेश अधिवेशन संपन्न होत आहे.


यावर्षी अभाविपने देशभरात ५५ लाख १२ हजार ४७० सदस्यांची नोंदणी केली आहे. जगातील सर्वात मोठे विद्यार्थी संघटन म्हणून परिषदेने विक्रम प्रस्थापित केला आहे.या अनुषंगाने लातूर नगरीत होणाऱ्या ५९ व्या प्रदेश अधिवेशनात शैक्षणिक,सामाजिक विषयांवर प्रस्ताव पारित केले जाणार आहेत. अधिवेशनादरम्यान लातूर शहरातून भव्य शोभायात्रा काढली जाणार आहे.

या अधिवेशनाच्या पोस्टरचे प्रकाशन लातूर येथे संपन्न झाले. यावेळी चे संचालक स्वागत समिती कार्याध्यक्ष प्रा. शिवराज मोटेगावकर सर,अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे प्रदेश संघटनमंत्री सिद्धेश्वर लटपटे, स्वागत समिती सचिव श्री सुनील देशपांडे, स्वागत समिती सहसचिव प्रवीण कस्तुरे, महानगराध्यक्ष प्रा.डॉ.प्रसाद कदम, विभाग संघटनमंत्री अजित केंद्रे,सुशांत एकोर्गे उपस्थिती होती.

## चाकूरात कापड दुकानाला लागली आग २५ लाखाचे नुकसान

चाकूर : येथील अत्यंत गजबजलेल्या ठिकाणी असलेले बोथीरोड येथील केतकी ड्रेसेस या कापड दुकानाला रात्री आचानक आग लागली असून या आगीमध्ये तब्बल २५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

शहरातील बोथी रोड येथील अत्यंत गजबजलेल्या बाजारपेठेतील केतकी ड्रेसेस हे दुकान असून दररोजच्या प्रमाणे रविवारी रात्री या दुकानचे मालक बसवेश्वर पटणे व सिद्धेश्वर पटणे रात्री सव्वानऊ वाजता कापड दुकान बंद करून अलगरवाडी येथे घरी गेले असता रात्री सव्वा दहा वाजेच्या सुमारास चाकूरहून पवन सगरे या व्यक्तीने फोन करून सांगितले की तुमच्या बोथी रोड येथील कपड्याचे दुकानाला आग लागलेली आहे. तरी तुम्ही लवकर दुकानी या असे कळविल्यानंतर बसवेश्वर पटणे व सिद्धेश्वर पटणे हे तात्काळ दुकानी आले पण दुकानात जोराची आग लागलेली होती. अग्नीशामक गाडीद्वारे आग विझवणे सुरू होते.





या अचानक लागलेल्या आगीमध्ये दुकानातिल सर्व साहीत्य दुकानातील फर्निचर मध्ये ठेवलेले कपडे,साड्या, शूटिंग, शर्टींग, रेडीमेड ड्रेस, लहान मुलांचे कपडे व इतर महत्त्वाची कागदपत्रे संपूर्ण जळाली असून २५ लाखांचे आर्थिक नुकसान झाले आसुन या आगीत दुकानातील सर्व साहीत्य व कपडे जळून खाक झाले आहेत.नगरपंचायत कार्यालयाच्या अग्निशामक वाहनाने आग वेळीच नियत्रंनात आणल्याने मोठा अनर्थ टळला अन्यथा आजूबाजूच्या बऱ्याच दुकानांना आग लागली असती.

पटणे यांच्या दुकानातील शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीमुळे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असून त्याची नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी दुकान मालक बसवेश्वर पटणे व सिद्धेश्वर पटणे यांनी केली आहे.

# परभणी येथील शहीद : सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूची न्यायालयीन चौकशी करा..! संविधान प्रेमी, भिमकण्या : सरिताताई कांबळे यांनी केली मागणी

नवी मुंबई / के. एच. हनवते :- परभणी येथील पोलिसाच्या मारहाणीत मृत्यू पावलेल्या शहीद सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्युची न्यायालयीन चौकशी करा या मागणी करत संविधान प्रेमी नागरिकांनी नेरूळ पोलीस ठाणे येथे निदर्शने करण्यात आली. परभणी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या जवळ लावण्यात आलेल्या संविधान प्रास्ताविकेची विटंबना केल्यामुळे उद्भवलेल्या उद्रेकात तेथील पोलीस प्रशासनाने भीम अनुयायी यांना अमानुष अशी मारहाण केली. अनेकांना मोठ्या गुन्हा खाली अटक केली. त्याचे पडसाद संपूर्ण राज्यभर उमटले. या प्रकरणात न्यायालयीन कोठडी भोगत असलेल्या शहीद



सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू झाला. याला सर्वस्वी पोलीस प्रशासन जबाबदार आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची निवृत्त न्यायाधीशाच्या मार्फत न्यायालयीन चौकशी करावी. अशी मागणी करत समाजसेवीका, भिमकण्या : सरितातार्इ कांबळे व संविधान प्रेमी समाजसेवक : चंद्रकांत कांबळे यांनी नेरूळ पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक : ब्रह्माणंद नाईकवाडी यांना आपल्या विविध मागण्याचे जाहीर निवेदन दिले. याप्रसंगी नेरूळ विभागातील बहुसंख्य महीला उपस्थित होत्या.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE